# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०१७ / फाल्गुन ३०, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | गृहनिर्माण मंत्री | |
| (३) | कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २४**

---

**चंद्रपूर तसेच नागपूर जिल्हयातील अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराबाबत**

**(१) * ८२०७२ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) परिसरातील टेकरी येथे राहणाऱ्या सहा वर्षीय मुलीला चॉकलेटचे आमिष दाखवून गावाबाहेर नेऊन अत्याचार करण्यात आल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर येथील सिंधी शाळेजवळ राहणाऱ्या पाच वर्षीय मुलीवर दिनाक ६ फेब्रुवारी, २०१७ रोजी शेजारी राहणाऱ्या फोटोग्राफरने अत्याचार केल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचा तपशिल काय आहे व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे,
दि.२.२.२०१७ रोजी पिडीत मुलगी हि घरासमोर खेळत असताना आरोपीने तिचा हात पकडून वाकल रोडवरील पोल्ट्री फार्मकडे घेवून गेला व विनयभंग केला.
(२) होय,
(३) चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही येथील घटनेमध्ये पोलीस स्टेशन सिंदेवाही येथे अप.क्र.६१/२०१७ कलम ३६३, ३५४(अ) १(एक) भादवि सह कलम ८ लैंगिक अपराधापासून बालकाचे संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

नागपूर येथील घटनेमध्ये दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन तहसिल अपराध क्रमांक ३३/२०१७ कलम ३७६(१), ५०६ भादवि सह कलम ४, ६, १२, १४ पोक्सो कायदा अन्वये दि.५.२.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर महानगरपालिकेत स्थानिक संस्था कर वसूलीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) * ७३९८७ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर महानगरपालिकेचे स्थानिक संस्था कर वसूलीचे उद्दिष्ट रु. १५० कोटी असतांना फक्त रु.४९ कोटीची वसूली झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक संस्था कर वसूलीच्या वेळी व्यापाऱ्यांनी दिलेले धनादेशही वटले नसून वसूली अधिकाऱ्यांनी संबंधित व्यापाऱ्यांशी संगनमत करुन जाणीवपूर्वक वसूली केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक संस्था कर वसूली न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर नगरपालिकेमार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) स्थानिक संस्था करापोटी १२ व्यापाऱ्यांनी दिलेले रु. ३,२८,१२३/- चे धनादेश वटले नाहीत. तथापि, यापैकी ५ व्यापाऱ्यांनी रु. २,३१,९९०/- बँकेत

भरणा केला आहे, ३ व्यापाऱ्यांची स्थानिक संस्था कराची नोंदणी नसल्याने त्यांचे रु.४३,२९०/- जमा झालेले नाहीत. उर्वरीत ४ व्यापाऱ्यांकडून रु.५२,८४३/- येणे बाकी असून, संबंधितांना नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तळोजा औद्योगिक वसाहत (ता.पनवेल, जि.रायगड) येथील मेंबा केम या पेट्रोलियम कंपनीमध्ये लागलेल्या आगीच्या घटनेबाबत**

**(३) * ७६५६३ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा औद्योगिक वसाहत (ता.पनवेल,जि.रायगड) येथील मेंबा केम या पेट्रोलियम कंपनीत दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास आग लागल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळोजा औद्योगिक वसाहत परिसरात माहे जून, २०१६ पासून कंपनीत आग लागण्याची ही ५ वी घटना असून सदर औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा घटना वारंवार घडू नयेत म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच संबंधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीत मेंबा केम इंडस्ट्रिज, प्रा. लि., या कारखान्यात दि.१९/१२/२०१६ रोजी आग लागली होती.

(२) हे खरे नाही.

तळोजा औद्योगिक वसाहत परिसरातील कंपन्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालेला नाही.

(३) भविष्यात अशा घटना घडू नयेत याकरीता वसाहतीमध्ये कामगारांच्या सुरक्षेबाबत मार्ग द्वारे सुरक्षेचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात येतात. तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या निरीक्षणाच्या वेळी आढळलेल्या सुरक्षाविषयक त्रुटींबाबतची पूर्तता करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येतो.

मेंबा केम इंडस्ट्रिज प्रा. लिमिटेड, मे. कैरव केमोफार्ब इंडस्ट्रिज लि. व मे. निडीलेक्स फाईन केम प्रा. लिमिटेड या कारखान्यांनी कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चा भंग केल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रत्येकी एक फौजदारी मा. मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात खटला दाखल केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भांडुप (मुंबई) येथील जी.के.डब्ल्यू कंपनीच्या कामगारांची थकित देणी अदा करण्याबाबत

**(४) * ७८४२५ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (मुंबई) येथील जी.के.डब्ल्यू कंपनीच्या व्यवस्थापनाने कंपनीची जमिन विक्री करण्याची परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनी बंद करतांना कामगारांना व्ही.आर.एस. न देता केवळ सेप्रेशन स्कीमची तुटपुंजी रक्कम देवून तसेच युनियन सोबत अनधिकृत करार करून कामगारांची प्रलंबित देणी दिलेली नसल्याने सदर देणी दिल्याशिवाय कंपनीस जमिन विक्री करण्याची परवानगी देण्यात येवू नये अशी मागणी सँकी कर्मचारी वर्ग आणि लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री व कामगार मंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट आणि सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) भांडूप, मुंबई येथील जी.के.डब्ल्यू या आस्थापनेस जमिनीचे विकास/विक्री/ हस्तांतरण करण्याकरीता आवश्यक असणारे कामगारांची कायदेशीर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे.
(२) जी.के.डब्ल्यू कंपनीस कामगारांची थकीत देणी दिल्याशिवाय भांडूप येथील जमिनीची विक्री करण्यास परवानगी न देण्याबाबतचे सँकी कर्मचारीवर्ग आणि लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व कामगार मंत्री यांना सादर केलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.
(३) सदर आस्थापनेस कामगारांची कायदेशीर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून अद्यापपर्यंत सदर ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत किटकनाशक व अळी नाशकाची औषधी फवारणी केली असल्याची बनावट नस्ती पेस्ट कंट्रोल कंपनीने तयार केल्याबाबत**

**(५) * ७९८१६ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या सिडको भागात किटकनाशक व अळी नाशकाची औषधी फवारणी केली असल्याची बनावट नस्ती पेस्ट कंट्रोल कंपनीने तयार करुन या नस्तीमध्ये ९ लाख ९७ हजार रुपयांची फवारणी केल्याचे बनावट देयक सादर करुन त्यावर पर्यवेक्षक, जीवशास्त्रज्ञ, आरोग्य अधिकारी, आयुक्त यांच्या बनावट सहया करून जवळपास दहा लाख रुपयांचा गैरव्यवहार करण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेतील काही अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमतानेच सदर बनावट नस्ती पेस्ट कंट्रोल कंपनीने तयार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदरची बाब निदर्शनास आल्यानंतर संबंधित एजन्सीविरुध्द दिनांक १४.१.२०१७ रोजी सिटी चौक पोलिस स्टेशन, औरंगाबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणी औरंगाबाद महानगरपालिकेकडून त्रिसदस्यीय समिती स्थापन करुन सखोल चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नाशिक महानगरपालिकेत भुयारी गटार योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) * ७९०२७ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेत केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियान योजनेंतर्गत भुयारी गटार योजनेच्या कामात रु. २२५ कोटीचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराबाबतची तक्रार मा.लोकायुक्त यांचेकडे करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४)

- संस्थापक, गोदावरी नागरी सेवा समिती, नाशिक यांनी मा. लोक आयुक्त यांचेकडे जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामात अनियमितता झाल्याबाबत तक्रार नोव्हेंबर, २०१६ मध्ये केली होती.
- सदर तक्रारीच्या अनुषंगाने मा. लोक आयुक्त कार्यालयाने थेट नाशिक महानगरपालिकेकडून डिसेंबर, २०१६ मध्ये अहवाल मागविला आहे.
- त्याअनुषंगाने नाशिक महानगरपालिकेने केलेली सर्व प्रकल्प कामे व खर्च हे नियमाप्रमाणे असुन त्यामध्ये कोणतीही अनियमितता नसल्याबाबतचा अहवाल मा. लोक आयुक्त यांना सादर करण्यात आला आहे.
- मा. लोक आयुक्त महोदयांच्या आदेशानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

### मौजे गुंदवली (ता.भिवंडी, जि. ठाणे) येथे शासकीय नियमांचे उल्लंघन करुन अनधिकृत बांधकाम करण्यात येत असल्याबाबत

**(७) * ७९६९९ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गुंदवली (ता.भिवंडी, जि. ठाणे) येथील इंडियन ऑईल कॉर्पोरेशन व इतर खाजगी कंपन्यांनी कोणतीही परवानगी न घेता शासकीय नियमांचे उल्लंघन करुन अनधिकृत बांधकाम केल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महसूल राज्यमंत्री व सचिव, महसूल विभाग यांच्याकडे दिनांक ९ मार्च, २०१६ व दिनांक १८ मे, २०१६ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. उच्च न्यायालयाचे तिवरांच्या झाडांचे संरक्षण करण्याबाबत आदेश असतांनाही हजारो तिवरांची झाडे नष्ट करुन खाडीपात्रात मोठ्या प्रमाणावर भराव करुन अनधिकृत बांधकामे उभारली जात असल्याबाबत अनेकवेळा तक्रारी करुनही महसूल विभागांकडून सदरहू बांधकामे निष्कासित करण्याबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासकीय परवानगी न घेता अनधिकृत बांधकाम करणाऱ्या संबंधितांविरुध्द व सदरहू अनधिकृत बांधकामे तोडण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या तहसिलदार, प्रांत व गटविकास अधिकारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२), (३) व (४) भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती झाल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मौजे गुंदवली ता. भिवंडी, जि. ठाणे या गावामध्ये ५ अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नगर नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये संबंधितांना नोटीस बजावली आहे. तसेच या ५ पैकी ४ प्रकरणांमध्ये संबंधितांवर गुन्हे दाखल केले आहेत. पोलिस बंदोबस्त प्राप्त होताच अनधिकृत बांधकामे निष्कासन करण्याबाबतची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर करण्यात येत आहे.

सहाय्यक नियंत्रक (अनधिकृत बांधकाम) मु.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी मौजे गुंदवली ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सर्वे नं. २६/९ जमिनीवरील अनधिकृत बांधकामाबाबत दिनांक ०६/०५/२०१५ रोजी निष्कासनाबाबतची नोटीस विकासकास देण्यात आली असता विकासकांनी सदर जमिनीवरील अनधिकृत बांधकामाबाबत भिवंडी येथील दिवाणी न्यायालयात दावा क्रमांक ३९५/२०१५ हा दाखल केलेला असून मा. न्यायालयाने जैसे थे परिस्थिती राखण्याचा आदेश दिलेला आहे. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक २९/०६/२०१७ रोजी ठेवण्यात आली आहे. मौजे गुंदवली सर्वे नं ३१ ते ५१, ५३, ५५ व मौजे दिवे अंजूर ३६, ३७, ३८ याबाबत भिवंडी न्यायालयात विशेष दिवाणी खटला क्र. ७४२/१२ हा दावा दाखल असून सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक २४/०४/२०१७ रोजी ठेवण्यात आली आहे.

-----------------

## बुलडाणा नगरपरिषद अंतर्गत घरकुल योजनेच्या निधीत अनियमितता झाल्याबाबत

**(८) * ८००६८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा नगरपरिषद अंतर्गत घरकुल योजनेचा निधी जागा खरेदीसाठी वापरून आर्थिक अनियमितता झाल्याचा अहवाल माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी नगरपरिषद अधिनियम व वित्तीय बाबीचे उल्लंघन सिध्द झाले असूनही संबधित दोषी अधिका-यांवर अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम या योजनेसाठी रु.२ कोटीचा निधी शासकीय जमीन खरेदी करण्यासाठी नियमबाहयरित्या खर्च केल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे तक्रार केली आहे. त्याअनुषंगाने मुख्याधिकारी, बुलढाणा यांनी सादर केलेल्या अहवालानुसार विविध शासकीय योजनांचे बचतखात्यामध्ये जमा असलेल्या व्याजाच्या रक्कमेतून शासकीय जमीन खरेदीसाठी बुलढाणा नगरपरिषदेने दि.२५.१.२०१६ रोजीच्या ठराव क्र.१७ अन्वये मंजूरी दिली आहे. केंद्र पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाकडून प्राप्त निधीवरील रु.३.५५ कोटी जमा व्याजाच्या रक्कमेतून रु.१.९० कोटी रक्कम शासकीय जमीन खरेदी करण्यासाठी खर्च केली आहे, असे जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी उपाध्यक्ष, म्हाडा यांना दि. १५.६.२०१६ रोजीच्या अहवालात नमूद केले आहे.

(२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयोगिक नागरी अधिनियम १९६५ चे कलम ९० पोट कलम २ नुसार राज्य शासनास कोणत्याही प्रयोजनासाठी, कोणत्याही अटी व शर्तीच्या अधीन राहून नगरपालिकांना अनुदान देता येईल, अशी अनुदाने ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली असतील

त्याच प्रयोजनासाठी त्याचा विनियोग केला पाहिजे, अशी तरतूद आहे. तथापि, बुलढाणा नगरपरिषदेने एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रमातंर्गत योजनेचा निधी इतर प्रयोजनासाठी वापरुन वित्तीय अनियमितता केली असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत असल्याचे जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, बुलढाणा यांना दि.१५.६.२०१६ च्या पत्राने कळविले आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी स्तरावर चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दक्षिण मुंबईत गुन्हेगार आणि दहशतवाद्यांवर नजर ठेवण्यासाठी उभारण्यात आलेले टेहाळणी मनोरे विनावापर असल्याबाबत

**(९) * ७६७१२ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईत गुन्हेगार आणि दहशतवाद्यांवर नजर ठेवण्यासाठी शासनाने लाखो रुपये खर्च करुन २२ पोलिस ठाण्यांअंतर्गत ४८ टेहाळणी मनोरे (टॉवर) उभारण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयानुसार फोर्ट परिसरातील सीएसटी, गेट वे ऑफ इंडिया, काळबादेवी, मेट्रो सिनेमा, कॉफर्ड मार्केट याठिकाणी टेहाळणी मनोरे उभारण्यात आले असूनही सदर मनोऱ्यांचा वापर अद्‌याप करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबीची शासनाने चौकशी /पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

दक्षिण मुंबईत खालील नमूद ठिकाणी सन २०१५ मध्ये “माईल स्टोन” या कंपनीच्या सहकार्याने रहदारी, वाहतुकीस व पादचाऱ्यांना अडथळा न करता तात्पुरत्या स्वरुपात टेहाळणी मनोरे (वॉच टॉवर) उभारण्यात आले आहेत. सदर टेहाळणी मनोऱ्यांचा वापर मिरवणूक/ आंदोलने/मोर्चे, इ. वेळी कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी करण्यात येत असतो.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | टेहाळणी मनोऱ्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | कफ परेड | बधवार पार्क |
| २. | कुलाबा | रिगल |
| ३. | मरीन ड्राईव्ह | चर्चगेट रेल्वे स्थानक |
| ४. | माता रमाबाई आंबेडकर मार्ग | हुतात्मा चौक |
| ५. | आझाद मैदान | मेट्रो जंक्शन |
| ६. | आझाद मैदान | आझाद मैदान |
| ७. | गावदेवी | कॅडबरी जंक्शन |
| ८. | व्हि.पी.रोड | कॉटन एक्स्चेंज |
| ९. | एल.टी.मार्ग | वर्धमान चौक |
| १०. | एल.टी.मार्ग | लोहार चाळ पोलिस चौकी |

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून नियमबाह्यरित्या शिक्षक भरती केली जात असल्याबाबत

**(१०) * ८०४६१ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून शिक्षक भरतीसाठी जाहिराती प्रसिद्ध करून नियमबाह्य शिक्षक भरती करुन एकाच जाहिरातीतून ४२८ शिक्षकांच्या पदांना गत चार वर्षांत मान्यता दिल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मान्यता दिलेल्या शिक्षकांपैकी २२२ पदे भरली असून ८८ पदांसाठीचा प्रस्ताव शिक्षणाधिका-यांकडे मान्यतेकरिता सादर केल्यानंतर सदरहू प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधीत दोषी अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हिंदी माध्यमाच्या शाळांमधील १०२, उर्दु माध्यमाच्या शाळांमधील ४२८ व मुंबई पब्लिक स्कुल (इंग्रजी माध्यम) शाळांमधील २२४ अशा एकूण ७५४ प्रशिक्षित शिक्षकांच्या (शिक्षण सेवक) पदांसाठी दिनांक १० जून, २०१३ रोजी आयुक्तांच्या मान्यतेने जाहिरात देण्यात आली होती.

त्यामुळे नियमबाहय शिक्षक भरती केली जात होती हे खरे नाही.

(२) सदर जाहिरातीनुसार महानगरपालिकेच्या शाळांमधील हिंदी माध्यमाची १०१, उर्दु माध्यमाची २१६ आणि मुंबई पब्लिक स्कुल (इंग्रजी माध्यम) ची १८० अशी एकूण ४९७ पदे भरण्यात आली असून, जाहिरातीत नमूद केलेल्या पदांपैकी, हिंदी माध्यमाचे १, उर्दु माध्यमाची २१२ व मुंबई पब्लिक स्कुल (इंग्रजी माध्यम) ची ४४ अशी एकूण २५७ शिक्षकांची पदे रिक्त आहेत.

सदर जाहिरातीनंतर उर्दु माध्यमाच्या भरण्यात आलेल्या २१६ पदांपैकी १३१ पदे सप्टेंबर २०१३ ते ऑगस्ट २०१४ या प्रथम वर्षात भरण्यात आली असून, निवड यादीला मुदतवाढ घेऊन उर्वरित ८५ पदे सप्टेंबर, २०१४ ते ऑगस्ट, २०१५ या कालावधीत भरण्यात आली आहेत.

उर्दु माध्यमाच्या उर्वरित २१२ पदांपैकी निवड यादीतील ८८ उमेदवारांच्या नियुक्तीबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मान्यता प्राप्त झाली आहे.

परंतु, सदर पदे अद्यापी भरण्यात आलेली नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाकडून बिस्कीट वाटपामध्ये झालेला गैरव्यवहार

**(११) * ८२२११ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाकडून प्रजासत्ताकदिनी सुमारे १ लाख ६ हजार विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या बिस्कीटांच्या खरेदीत ठेकेदाराकडून गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिस्किटाच्या पुड्याचा छापील दर चार रुपये असताना बिस्कीट वाटपाचा ठेका देताना संबधित ठेकेदाराने ४.५० रुपये प्रति बिस्कीट पुड्याचा दर दिलेला असून वाटप केलेले बिस्कीटाचे वजन ६०-७० ग्रॅम ऐवजी ५४ ग्रॅम वजन असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बिस्कीट पुडा खरेदी निविदा प्रक्रियेसाठी किती ठेकेदारांनी निविदा भरल्या होत्या व त्यापैकी किती ठेकेदार पात्र ठरले होते,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबधित ठेकेदार व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) छापील किंमतीपेक्षा म्हणजेच रूपये ४/- ऐवजी जादा दराने (रुपये ४.५०/-) ठेकेदारांकडून बिस्कीट पुडयांची खरेदी करण्यासाठी दि.७.१.२०१७ रोजी पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडून कार्यादेश देण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे. विषयाधीन बिस्कीटांचे वजन ५८ ग्रॅम असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) या प्रकरणी एकूण २ वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या.

त्यापैकी पहिल्या निविदेतील तीनही निविदा धारक अपात्र ठरल्याने दि.१६.१२.२०१६ रोजी नव्याने निविदा मागविल्या होत्या.

सदर निविदेत एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या असून सदरचे चारही निविदा धारक पात्र ठरले होते.
(४) याप्रकरणी एमआरपीपेक्षा जादा दराने कार्यादेश देण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचा-यांची खातेनिहाय चौकशी करण्याबाबत पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नालासोपारा (ता. वसई, जि.पालघर) येथे टेम्पोने धडक दिल्याने दोन विद्यार्थ्यांचा मृत्यु झाल्याबाबत**

**(१२) * ८२२१९ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (ता. वसई, जि.पालघर) येथील संतोष भुवन परिसरात रस्ता ओलांडताना भरधाव टेम्पोने धडक दिल्याने दोन विद्यार्थ्यांचा मृत्यु तर दोन जण जखमी झाल्याची घटना दिनांक ६ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर परिसरात भविष्यात अपघाताच्या घटना घडू नयेत म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर अपघाताच्या घटनेबाबत तुळींज पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७२/२०१७, भा.दं.वि.कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, मो.वा.का. कलम १८४ व १८७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील वाहनचालक आरोपी यास दिनांक ०६.०२.२०१७ रोजी अटक करण्यात आली असून आरोपी सध्या जामीनावर आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.

भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून सदर ठिकाणच्या रस्त्यावर स्पीड ब्रेकर लावण्यांत आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मस्जिद बंदर परिसरात अनधिकृतरित्या उभारण्यात आलेल्या इमारतींबाबत**

**(१३) * ७६१४४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मस्जिद बंदर येथील केशवजी नाईक मार्गावर अनधिकृतरित्या उभारण्यात आलेली ११ मजली इमारत पाडण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले असतानाही

विकासक, ठेकेदार व महापालिकेच्या अधिका-यांच्या संगनमतामुळे महापालिकेकडून उक्त इमारतीवर कारवाई करण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कारवाईस विलंब होत असल्याने या परिसरात झकारिया मस्जीद मार्गावरील चावला गल्लीतील इमारत क्रमांक १११, ९४/९६, ९५/९८, मेमन वाडयातील गवळी मोहल्ल्यातील इमारत क्रमांक ५१ व ५५, निसानपाडा क्रॉस लेनमधील इमारत क्रमांक ३५/३६, मिनर्वा मस्जीद गल्लीमधील इमारत क्र ८७ व ७७, काझी सैय्यद स्ट्रीटवरील इमारत क्र १७/१९ अशा आणखी ९ इमारती नियमांचे उल्लंघन करुन त्या परिसरात उभारण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरहू बेकायदेशीर इमारती विनाविलंब निष्कासित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सदर इमारत ही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ रोजी पूर्णपणे निष्कासित करण्यात आलेली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

झकेरिया मस्जिद मार्गावरील इमारत क्रमांक १११, ९४/९६, ९५/९८, मेमन वाडा येथील इमारत क्रमांक ५१, ५५ व ७७, काझी स्ट्रीटवरील इमारत क्रमांक १७/१९ या ७ इमारतींवर मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ नुसार कारवाई सुरु आहे. तसेच संबंधितांवर एम.आर.टी.पी. ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

सद्य:स्थितीत सदरहू प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्यामुळे मा. न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिकेमार्फत पुढील कारवाई करण्यात येईल.

निसानपाडा, क्रॉस लेन येथील इमारत क्रमांक ३५/३६ येथील इमारतीचे ७ मजले बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आले आहेत. सद्यस्थितीत उर्वरित तळमजला + १ या बांधकामाच्या निष्कासनाचे काम सुरु आहे.

मेमनवाडा येथील इमारत क्रमांक ८७ मध्ये म्हाडाने परवानगी न दिलेले तिसऱ्या व चौथ्या मजल्यावरील बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील लव्हग्रोव्ह पंम्पिग केंद्रात व्हॉल्व खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(१४) * ७९४२२ श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथे समुद्रात वाहून जाणा-या सांडपाण्यावर पुर्नप्रकिया करण्यासाठी वरळी येथील लव्हग्रोव्ह पंम्पिग केंद्रात १,४०० मिमि आकाराचा नाईफ गेट वॉल्व्ह बसवला जात असुन व्हॉल्व खरेदीत गैरव्यवहार होत असल्याच्या आरोपामुळे मा.मुख्यमंत्री यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्तांना चौकशीचे आदेश दिले असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेचे वरळी येथील सांडपाणी पुर्नप्रक्रिया केंद्र २५ वर्ष जुने असून त्यातील सहा पंम्पिग यंत्रे कालबाह्य झाल्याने ती बदलण्याची शिफारस मलनि:सारण प्रचालन विभागाने केली असून बदलण्यात येणारी नाईफ गेट वॉल्व्ह निकृष्ट दर्जाची असल्याची तक्रार आल्यानंतर मा.मुख्यमंत्री यांनी चौकशी आदेश देऊनच या खरेदीचा प्रस्ताव स्थायी समितीत आणला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त बाब लक्षात घेता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मा. मुख्यमंत्री यांनी लव्हग्रोव्ह पंपिंग केंद्रातील १४०० मि.मि. आकाराच्या नाईफ गेट व्हॉल्वच्या खरेदीतील गैरव्यवहाराविषयी चौकशी आदेश दिले नसून, लव्हग्रोव्ह पंपिंग केंद्रासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या विविध संयंत्रांची निकड याविषयी चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

(२), (३) व (४) लव्हग्रोव्ह पंपिंग केंद्रातील ८ पंपिंग यंत्रांपैकी ३ पंपिंग यंत्रे बंद असल्यामुळे ती बदलण्याची शिफारस महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रचालन विभागाने केली होती.

सदर शिफारशीनुसार महानगरपालिकेच्या प्रचलित पध्दतीस अनुसरुन विहित तांत्रिक विनिर्देशांसह (specifications) निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली होती.

परंतु मा. मुख्यमंत्री यांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतर, विविध संयंत्रांच्या निकडीच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत दिनांक १९.०९.२०१६ रोजी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली.

सदर समितीने लव्हग्रोव्ह पंपिंग केंद्रातील सर्व संयंत्रांच्या सद्य:स्थितीचा आढावा घेऊन केलेल्या शिफारशीनुसार, ८ पंपिंग यंत्रांपैकी ३ पंपिंग यंत्रे बदलण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मांडण्यात आला.

सदर यंत्रांच्या खरेदीची कार्यवाही सुरु असल्यामुळे सदर यंत्रे निकृष्ट दर्जाची असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणांतर्गत बांधण्यात येत असलेल्या प्रकल्पामधील बनावट भाडेकरुंची नावे वगळण्याबाबत

**(१५) * ७४२२३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महापालिकेच्या अंधेरी के-वेस्ट्‌ वॉर्ड मधील झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणांतर्गत बांधण्यात येत असलेल्या ६ प्रकल्पामध्ये १००० बनावट भाडेकरु असल्याचा अहवाल उप जिल्हाधिकारी यांना सादर केल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या अंधेरी के-वेस्ट्‌ वॉर्डमध्ये झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणांतर्गत बांधण्यात येत असलेल्या ३९ इमारतीची तपासणी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एसआरए अंतर्गत तलाव मार्केट को ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी (चांदीवाल डेव्हलपर्स) ११४ पैकी ८४ बनावट भाडेकरु, राघवेंद्र को ऑपरेटीव्ह हाउसिंग सोसायटी (सहयोग होम डेव्हलपर्स) ८४१ पैकी २८४ बनावट भाडेकरु, महाराष्ट्र सेवा संघ आणि ११ को ऑपरेटीव्ह हाउसिंग सोसायटी (सप्रा स्टेट इंडीया) १३०८ पैकी ४४५ बनावट भाडेकरु, पटेल चाळ को ऑपरेटीव्ह हाउसिंग सोसायटी (युनायटेड डेव्हलपर्स) १२० पैकी १७ बनावट भाडेकरु, युनायटेड को ऑपरेटीव्ह हाउसिंग सोसायटी (रिलायन्स कंन्सट्रक्शन) १२० पैकी ७६ बनावट भाडेकरु, अजमेरी को ऑपरेटीव्ह हाउसिंग सोसायटी (कुनाल डेव्हलपर्स) २०० पैकी ५१ बनावट भाडेकरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती बनावट भाडेकरुंची नावे वगळण्याबाबत तसेच नागरीकांची फसवणूक करणा-या विकासकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अंधेरी के वेस्ट वॉर्ड येथील ६ झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अंदाजे ७३८ झोपडीधारकांनी सादर केलेले पुरावे अविश्वसनीय असल्याचे पडताळणी अंती आढळून आले आहे.

(२) होय. के/वॉर्ड च्या तलाव मार्केट, राघवेंद्र, महाराष्ट्र सेवा संघ व इतर ११, अंधेरी युनायटेड, पटेल चाळ, अजमेरी या ०६ योजनांसहीत इतर इमारतींमध्ये राहणाऱ्या व्यक्तींची सदनिका तपासणी करण्याच्या मोहिमे अंतर्गत तपासणी करुन एकूण ३२ गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्वसन इमारतींतील एकूण १०२९ सदनिकाधारकांची प्रकरणे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(ई) नुसार निष्कासनाची कारवाई करण्याकरीता सक्षम प्राधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत कळविण्यात आले आहे.

(३) अतिरिक्त जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे यांचेकडून प्राप्त माहितीनुसार

१. तलाव मार्केट को.ऑप.हौ.सोसायटी मध्ये ६४ झोपडीधारक,

२.राघवेंद्र को.ऑप.हौ.सोसायटी मध्ये २२३ झोपडीधारक,

३.महाराष्ट्र सेवा संघ आणि ११ को.ऑप. हौ.सोसायटी मध्ये ३७३ झोपडीधारक,

४.पटेल चाळ को.ऑप.हौ.सोसा. मध्ये १६ झोपडीधारक,

५.युनायटेड को.ऑप.हौ.सोसा. मध्ये ११ झोपडीधारक,

६.अजमेरी को.ऑप.हौ.सोसा. मध्ये ५१ झोपडीधारक यांनी पात्रतेच्या अनुषंगाने सादर केलेले पुरावे अविश्वसनीय असल्याचे पडताळणी अंती दिसून आले.

(४) प्रश्न भाग ३ मधील उत्तरातील अनुक्रमांक १ ते ४ मध्ये नमूद झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये अविश्वसनीय पुरावे सादर केलेल्या व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्याबाबत उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) अंधेरी-१ यांनी दि. २/३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये खेरवाडी पोलिस स्टेशन यांना कळविले आहे. तसेच अनुक्रमांक ५ प्रकरणी परिशिष्ट-२ मधील इतर अनियमिततेच्या तक्रारीबाबत उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) अंधेरी- १ यांच्या स्तरावर पडताळणी करण्यात येत आहे. तसेच अनुक्रमांक ६ येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत अविश्वसनीय पुरावे पडताळणी अंती दिसून आल्याने सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून ५१ पैकी ४२ व्यक्तींना यापूर्वीच अपात्र करण्यात आले आहे. उर्वरित प्रकरणांची पडताळणी सुरु आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ (ई) मधील तरतुदीनुसार पुनर्वसन सदनिकेमध्ये १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वी झालेल्या खरेदी-विक्री व्यवहारातून अनधिकृत वास्तव्य करणाऱ्यांविरुध्द संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत नोटीसा देवून निष्कासनाची कारवाई करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयात लाचलुचत प्रतिबंधक विभागाने १५९ पोलिसांना लाच घेताना अटक केल्याबाबत

**(१६) * ८३२३४ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात लाचलुचत प्रतिबंधक विभागाने माहे जानेवारी ते डिसेंबर, २०१६ रोजी या कालावधीत एकूण १०९ सापळे रचून त्यात १५९ पोलिसांना लाच घेताना अटक केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच लाचखोरी रोखण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांनी दिनांक १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१६ या कालावधीत पोलीस विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्याविरूध्द एकुण ७ प्रकरणी सापळे कारवाई केली असून त्यामध्ये ३ अधिकारी, ७ कर्मचारी व १ खाजगी इसम अशा एकूण ११ व्यक्तींवर गुन्हा नोंदविला आहे.

आरोपी लोकसेवकास त्यांचे सक्षम प्राधिका-यांनी निलंबित केले आहे. दाखल गुन्ह्यापैकी ४ प्रकरणात मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून उर्वरित ३ प्रकरणी अभियोग मंजुरीसाठीचा प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. तसेच भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून शाळा, कॉलेज, सार्वजनिक ठिकाणे, यात्रा, आठवडी बाजार इत्यादी ठिकाणी भ्रष्टाचार निर्मुलन संबंधाने नियमितपणे जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

-----------------

## अहमदनगर जिल्हयाच्या तत्कालीन पोलीस अधिक्षकांनी शेतक-यांची आर्थिक फसवणूक करून जमिन अत्यल्प किंमतीत खरेदी केल्याबाबत

**(१७) * ७५२५७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयाचे तत्कालीन पोलीस अधिक्षक श्री. कृष्ण प्रकाश यांनी अहमदनगर येथे २ एकर आणि शिर्डी येथे ३ एकर जमीन अत्यल्प किंमतीत खरेदी करुन शेतक-यांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी तत्कालीन गृह मंत्री यांनी अतिरिक्त. संचालक स्तरावरावरील अधिका-यांकडून चौकशी करून तीन महिन्यात अहवाल सादर करण्याचे आश्वासन देवूनही अद्याप शासनाकडून याबाबत कोणती ही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनास सादर झालेल्या अहवालातील निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांविरूध्द शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व कार्यवाहीस किती कालावधी लागण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) तत्कालीन गृहमंत्री यांनी सन २०१३ च्या दुसरे अधिवेशनामध्ये (पावसाळी) विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ११३५४६ चे उत्तर देतेवेळी ॲन्टी करप्शन ब्युरोच्या आय. जी.लेव्हलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत सर्व गोष्टींची चौकशी करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. सदर आश्वासनाच्या अनुषंगाने महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी चौकशी करुन अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालात श्री. कृष्ण प्रकाश यांच्यावरील तक्रारीत तथ्य नसल्याचे नमूद केले आहे. त्यास अनुसरून विभागाने आश्वासन पूर्ततेचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवलेला आहे. त्यामुळे संबंधीतावर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळोजा औद्योगिक वसाहत (जि.रायगड) येथील गौसिया कोल्ड स्टोरेज कंपनीत शॉक सर्किटने तीन कामगारांचा मृत्यु झाल्याबाबत

**(१८) * ८३१३५ श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील प्लांट नंबर एम ७ गौसिया कोल्ड स्टोरेज कंपनीत दिनांक २९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास शॉक सर्किटने तीन कामगारांचा मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंपनी व्यवस्थापनाने सुरक्षतेबाबतची कोणतीही खबरदारी न घेतल्याने हा अपघात घडला असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधित व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मृत्यु पावलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना शासनाने कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, संचालनालयाने कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ३६ (२) (अ) व ३६ (२) (ब) आणि महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३, चा नियम ४ (४) च्या तरतुदींच्या भंगाबाबत कारखाना व्यवस्थापनास कारणे दाखवा नोटिस बजावली असून कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

तळोजा पोलिसांनी कारखान्याच्या मालकाविरुद्ध भा.द.वि.सं १८६० चे कलम ३०४(अ) नुसार दिनांक ३/२/२०१७ रोजी गुन्हा नोंदविला आहे. (गु.र.नं -००२२)

विद्युत निरीक्षक यांनी अपघातस्थळाच्या विद्युत संच मांडणीच्या दोषांचे त्वरीत निवारण करण्यासाठी व्यवस्थापनावर दोषपत्र व कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

कारखान्यास दिलेल्या समंतीपत्रातील प्रदूषणाबाबतच्या अटींचा भंग केल्याने व अपघाताची माहिती न कळविल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर कारखान्यास उत्पादन बंद करण्याचे आदेश पारीत केले आहेत.
(४) कारखान्याचे व्यवस्थापनाने मृत कामगारांच्या वारसास एकूण ९ लाख रुपये (प्रत्येकी रु. ३ लाख) सानुग्रह अनुदान दिले असून नुकसान भरपाईबाबत मा. आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, महाड, जि. रायगड यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---------------

## शहापूर (जि.ठाणे) मुंबई नाशिक महामार्गालगत असलेल्या डोहळे गावानजिक ट्रकने पोलिसांच्या वाहनाला धडक दिल्याबाबत

**(१९) * ७४९३० श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) मुंबई नाशिक महामार्गालगत असलेल्या डोहळे गावाजवळ

दिनांक २९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास नाशिकच्या दिशेने जाणा-या भरधाव ट्रकने पोलिसांच्या वाहनाला धडक दिल्याने वासिंद पोलिस ठाण्यातील हवालदार प्रमोद निवतकर (४७) यांचा जागीच मृत्यू होऊन तीन पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनस्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आरोपीवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच मृत पोलिस हवालदाराच्या नातेवाईकास व जखमी झालेल्या पोलिसांना शासनाने कोणत्या स्वरुपाची आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक २९.१२.२०१६ रोजी वाशिंद पोलीस ठाण्याची जीप क्रमांक एमएच-०४ ईपी-३२८ या वाहनातून वाशिंद पोलीस ठाण्याचे श्री.तुकाराम लिंगाळे, स.पो.फौ., श्री.निवतकर, पोलीस हवालदार व श्री.नांगरे, पोलिस शिपाई हे त्यांची डयूटी पुर्ण करुन जात असतांना मुंबई नाशिक महामार्गावर डोहाळे गांवाच्या हददीत वालीया हॉटेलसमोरील रोडवर उभ्या असलेल्या ट्रकला पोलीसांच्या जीपने धडक दिल्याने सदरचा अपघात होऊन त्यामध्ये पोलीस हवालदार श्री.प्रमोद निवतकर यांचा मृत्यु झाला असून वाहनातील इतर दोन पोलीस कर्मचारी जखमी झाले.

(२) या प्रकरणी ट्रकचालकाविरुध्द गु.र.क्र. ३८१/२०१६ भा.दं.वि. कलम ३०४(अ), ३३७, ३३८, ४२७ व मो.वा.का. कलम १०२/१७७ व आर.आर.आर. १५(२)/१७७ अन्वये पडघा पोलीस ठाणे येथे शासकीय वाहनाच्या नुकसानीस कारणीभूत झाला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आरोपीस अटक करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यांत आलेले आहे.

मयत पोलीस हवालदार यांच्या कायदेशीर वारसांना पोलीस कल्याण निधीतून अंत्यविधी अनुदान रु.१२,०००/- व सानुग्रह अनुदान रु.२०,०००/- असे एकूण रु.३२,०००/- मंजूर करण्यांत आलेले आहेत. तसेच न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी यांचेकडे समूह अपघात विमा मंजूर करण्याबाबत कळविण्यांत आलेले आहे. जखमी पोलिसांना आर्थिक मदत करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### सॅण्डहर्स्ट रोड स्थानकाजवळील हॅकॉक पूलच्या पुनर्बांधणीबाबत

**(२०) * ७८९२९ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सॅण्डहर्स्ट रोड स्थानका जवळील हॅकॉक पूल मोडकळीस आल्याने निष्कासीत करण्यात येवून एक वर्षाचा कालावधी होवूनही अद्याप बांधण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सॅण्डहर्स्ट रोड परिसरात राहणाऱ्या रहिवाश्यांना पूल नसल्याने क्रॉसिंग करताना फारच अडचणी निर्माण होत असून गत वर्षभरात क्रॉसिंग करताना १८ जणांचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील सँडहर्स्ट रोड या हार्बर लाईन रेल्वे स्थानकाजवळील हॅकॉक पूल रेल्वेमार्फत दिनांक ९ व १० जानेवारी, २०१६ रोजी तोडण्यात आला. तथापि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे पुनर्बांधणीचे काम अद्यापि सुरु झालेले नाही हे खरे आहे.

(२) सॅण्डहर्स्ट रोड स्थानक परिसरात रेल्वे लाईन क्रॉस करतांना सन २०१६ मध्ये एकूण २० इसमांचा मृत्यु झालेला आहे.

त्यापैकी, हॅकॉक पुल ज्या ठिकाणी तोडला आहे त्याठिकाणी रेल्वे लाईन क्रॉस करतांना ४ इसमांचा मृत्यु झाला आहे.

(३) व (४) सदर पुलाच्या पुनर्बांधणीकरीता निविदा मागवून दिनांक ०६.०५.२०१६ रोजी कार्यादेश देण्यात आले होते. तथापि, मा. उच्च न्यायालयाने सदर कंत्राट रद्द केल्याचा आदेश पारित केल्यामुळे महानगरपालिकेमार्फत पुनर्निविदेची प्रक्रिया सुरु करण्यात आली.

मा. उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात कंत्राटदाराने दाखल केलेल्या याचिकेमध्ये नवीन कंत्राट देण्याकरीता दिनांक १७.०४.२०१७ पर्यंत स्थगिती देण्यात आली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुमारे ३५०० बंदूकधारक शेतकऱ्यांच्या समस्येबाबत

**(२१) * ८२४१० श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुमारे ३५०० बंदूक धारक शेतकऱ्यांना बंदूक परवाना नुतनीकरणासाठी सन २०१७ पासून रुपये १५०० पर्यंत शुल्क आकारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून यापूर्वी कागदपत्रासाठी १२ ते १५ रुपये खर्चात प्रती वर्षी बंदूक परवान्याचे नुतनीकरण करून मिळत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेती संरक्षण बंदूका निवडणूक काळात पोलीस ठाण्यात जमा करण्यास निवडणूक यंत्रणा भाग पाडत असल्यामुळे सुमारे दीड महिना बंदुका अभावी वन्यप्राणी शेती बागायतीचे नुकसान करित असल्यामुळे परवानाधारक शेतकऱ्यांनीच बंदूक पोलीस ठाण्यात जमा करण्याची अट जाचक ठरत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने बंदूक परवाने निशुल्क करून देण्यासंदर्भात तसेच बंदूक पोलीस ठाण्यात जमा करण्याची जाचक अट रद्द करुन शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शस्त्र परवाना मंजूरी व नूतनीकरणासाठीची सुधारित फी केंद्र शासनाने तयार केलेल्या शस्त्र नियम, २०१६ अन्वये आकारण्यात येत आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापी उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी (जामीनावर मुक्त झालेली व्यक्ती, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेली व्यक्ती व निवडणूक कालावधीत दंगलीत सामील व्यक्ती) अशा एकूण १५२ शस्त्र परवानाधारकांचे शस्त्र आचार संहिता कालावधीसाठी लगतच्या पोलीस ठाण्यात अनामत जमा करणेबाबत दि.२४/०१/१७ अन्वये कळविण्यात आले होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कन्नमवार नगर (विक्रोळी पूर्व) येथील संक्रमण शिबीरातील रिक्त गाळयांचे बनावट कागदपत्रे बनवून केलेला गैरव्यवहार

**(२२) * ७८४३७ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे (म्हाडाचे) कार्यकारी अभियंता, ई-२, श्री. संजय जाधव, उप मुख्य अधिकारी, परि. ३, श्रीमती हसोळकर, भाडे वसुलीकर, श्री. राजपाल पाटील, इस्टेट मॅनेजर (सं.गा) श्री. किशोर जगताप व दलाल यांच्या संगनमताने विक्रोळी पूर्व, कन्नमवार नगर येथील संक्रमण शिबीरातील रिक्त गाळयांचे बनावट कागदपत्रे बनवून सदर गाळ्यांचा सोडतीत समाविष्ठ करुन नवीन पुर्नरचित इमारतीमध्ये वितरणाचे आदेश देवून करोडो रूपयांचा गैरव्यवहार करून शासनाची व गाळे खरेदी करणा-या सर्वसामान्य नागरीकांची फसवणूक करणाऱ्या अधिका-यांवर व दलालावर फौजदारी गुन्हे दाखल करून सदर गैरव्यवहाराची आणि त्यांच्या संपत्तीची सी.आय.डी मार्फत चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार म्हाडा अधिका-यांवर व दलालांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) विक्रोळी (पूर्व), कन्नमवार नगर येथील संक्रमण शिबिरातील गाळे वाटपामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचेकडे लोकप्रतिनिधी यांच्याकडून तक्रार प्राप्त झालेली आहे. प्रस्तृत तक्रारीच्या अनुषंगाने उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्या स्तरावर चौकशी करण्यात आली असून, यामध्ये कुठलाही गैरव्यवहार झाल्याचे आढळून आलेले नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि. ठाणे) येथे मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत बांधण्यात आलेल्या खाडीपार-काटई या रस्त्याच्या कामाबाबत

**(२३) * ८०११७ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि. ठाणे) येथे मुंबई महानगर विकास प्राधिकरणामार्फत खाडीपार-काटई या रस्त्याच्या सिमेंट कांक्रिटीकरणाचे बांधकामात कंत्राटदाराने निविदेच्या अटी व शर्तीचा भंग करुन तसेच संबंधित विभागाच्या अभियंत्यांशी संगनमत करुन निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्याबाबत चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी एमएमआरडीए आयुक्त यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कंत्राटदाराशी आर्थिक संगनमत करणाऱ्या संबंधित अभियंत्यांविरुध्द व निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) सदर प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने या कामाकरीता नियुक्त केलेल्या सल्लागारामार्फत तसेच प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांमार्फत खाडीपार-काटई रस्त्याच्या सिमेंट कॉक्रिटीकरणाच्या कामाची तपासणी करण्यात आली असुन

सदर रस्त्याच्या काही भागात आढळून आलेल्या सुक्ष्म भेगांची संबंधित ठेकेदाराकडून दुरुस्ती करुन घेण्यात आली आहे. प्रश्नाधिन खाडीपार-काटई रस्ता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेतलेल्या खोणी-कांबे या २.६ कि.मी. लांबीचा रस्त्याचा भाग आहे. सदर रस्त्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मानकाप्रमाणे करुन घेण्यात येत आहे.

-----------------

## ठाणे जिल्हा महापालिकेतील प्रस्ताव अमृत मिशन प्रकल्पांतर्गत प्रलंबित असल्याबाबत

**(२४) * ७६१९५ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी लागू केलेल्या अटल मिशन फॉर रिजुवेनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (एएमआरयूटी) म्हणजेच अमृत मिशन सुमारे दीड वर्षापूर्वी राज्यात लागू करण्यात आले असून राज्यातील ४३ शहरांचा त्यामध्ये समावेश असून त्यात ठाणे जिल्हयातील ठाणे, केडीएमसी, भिवंडी, नवी मुंबई व भाईंदर या महानगरपालिका समाविष्ट करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमृत मिशन प्रकल्पांतर्गत पाणी पुरवठा, मलनिस्सारण, नागरी वाहतूक, उद्यान विकास आदी बाबींसाठी संबंधित महापालिकांनी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आदींनी सुमारे ३ हजार ३१२ कोटी २६ लाख रूपये खर्चाचे प्रकल्प प्रस्तावित केले असून सदरहू प्रस्ताव आजमितीस प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रस्तावास आजमितीस मंजूरी न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावांना विनाविलंब मंजूरी मिळून कामांस सुरूवात होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१)

- शहरी भागातील लोकांचे जीवनमान उंचविण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान राज्यातील एक लक्षपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ४३ शहरे व विशेष १ अशा एकूण ४४ शहरांमध्ये ऑक्टोबर, २०१५ पासून राबविण्यात येत आहे.
- सदर अभियानामध्ये ठाणे जिल्ह्यातील ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर, उल्हासनगर, अंबरनाथ व कुळगांव-बदलापूर या अभियान शहरांचा समावेश आहे.

(२), (३), (४) व (५)

- अमृत अभियानांतर्गत राज्याचा सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षाचा आराखडा केंद्र शासनाने मंजूर केला आहे.
- सदर आराखड्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-निजामपूर, अंबरनाथ व कुळगांव-बदलापूर शहरांच्या पाणीपुरवठा योजनेचा तसेच उल्हासनगर व कल्याण-डोंबिवली शहराच्या मलनिस्सारण योजनेचा समावेश आहे.
- त्यानुसार संबधित शहरांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार उपरोक्त ५ शहरांच्या रु. ४७५.५५ कोटी किंमतीच्या प्रकल्पांना शासनाने मान्यता दिली आहे.
- सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षाच्या आराखड्यामध्ये अंबरनाथ व कुळगांव-बदलापूर शहर पाणीपुरवठा टप्पा-२, नवी मुंबई व ठाणे शहर मलनिस्सारण प्रकल्पांचा सुध्दा समावेश आहे.
- या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही संबंधित अभियान शहरांच्या स्तरावर सुरु आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.